# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** सिडको

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0309 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/05/2023 23:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 25/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Time From (वेळेपासून):** 15:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/05/2023 **Time (वेळ):** 23:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 053

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/05/2023 23:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

पूर्व, 0.2 किमी

(b) **Address (पत्ता):** साई रसवंती,सिडको पोलीस स्टेशनचे पाठीमागे ,N-7, सिडको औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



( PTO )

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संजय रामचंद्र लिहीणार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घाणेगाव ता गंगापुर,जि औरंगाबाद ,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घाणेगाव ता गंगापुर,जि औरंगाबाद ,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन दशरथ मोरे | | | 1. पोलीस उपनिरीक्षक,,पोलीस ठाणे सिडको, ,औरंगाबाद शहर, सिडको ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

...al value of property (In Rs/-)
(...रीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

...Inquest Report / U.D. case No., if any
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 25/05/2023

मी संजय रामचंद्र लिहीणार, वय-47 वर्षे, व्यवसाय-शेती , शिक्षण-10 वी पास रा. घाणेगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद मोबाईल नं. 9623241904

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 23/05/2023 रोजी मला लोकसेवक पैसे मागत असल्याने मी लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे," मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करुन उदरनिर्वाह करतो.

दिनांक 21/05/2021 रोजी मला माझे मित्र श्री. शामद भाई रा.जटवाडा यांनी माझी ओळख श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर, दोन्ही रा. ममनापुर ता. खुलताबाद जि.औरंगाबाद यांचेशी भेट करुन दिली व सांगितले की, या दोघांची अडचण आहे. तेव्हा मी त्यांना काय अडचण आहे. असे विचारले असता त्यांनी सांगितले की,नोटबंदीच्या काळात आम्ही दिनांक 08/11/2016 रोजी आमचे गाडीत शेतीचे 3,10,00,000/- (तीन कोटी दहा लाख रुपये फक्त ) पैसे घेवुन चाललो होतो . तेव्हा आमची गाडी फुलंब्री चौकात फुलंब्री पोलीसांनी अडवली. व गाडी मध्ये असलेली रक्कम 3,10,00,000/- (तीन कोटी दहा लाख रुपये फक्त ) रुपये पोलीसांनी जप्त करुन आमचेवर गुन्हा दाखल केला आहे. व रक्कम शासन खाती जमा केलेली आहे. जप्त केलेली रक्कम परत मिळावी म्हणुन आमचा मित्र श्री. किसन रामचंद्र जिते यांच्या नावाने मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल केलेली आहे. श्री. गिते यांचे दिनांक 19/02/2021 रोजी मरण पावले असुन यापुढे कोर्टात 2,66,000/- रुपये डिपॉजिट करायचे आहेत. व वकिलाची फीस भरायची आहे. केस अंतीम टप्प्यात आहे. व पंधरा दिवसात ऑर्डर होईल. तेव्हा तुम्ही आम्हाला पाच लाख रुपये द्या ऑर्डर झाल्यावर पंधरा दिवसांत तुम्हाला 10,00,000/- देऊ असे म्हणाले होते. त्यावेळी मी त्यांना पैसे दिले नव्हते.

त्यानंतर श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर, व श्री. शामद भाई रा.जटवाडा असे माझा मित्र हनिफ नुरखाँ पठाण, रा. मथुरानगर,एन-6 सिडको औरंगाबाद यांचे राहते घरी आले व मला व हनिफभाई यांना 1,50,000/- रुपये दाखवले व म्हणाले की, आता फक्त 1,16,000/- रुपये कमी पडत आहे. कृपा करुन तुम्ही देवून टाका अशी विनंती केली . त्यामुळे मी 66,000/- व माझा मित्र हनिफ पठाण यांनी 50,000/-असे एकुण 1,16,000/- रुपये श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर, यांना दिले होते.

त्यानंतर दोन महिन्यांनी मी श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांना फोनद्वारे संपर्क करुन व समक्ष भेटुन मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिकाचे काय झाले. तेव्हा वरील दोघांनी मला व श्री. हनिफ यांना उडवा-उडवीची उत्तरे दिली. व मी त्यांना पैसे भरल्याची पावती मागितली असता त्यांनी दिनांक 21 मे 2021 रोजी शिक्का असलेली चलनाची चलन नं., 3126/21 क्रमांकाची पावती दाखवली. तेव्हा आम्ही सदरची पावती ट्रेझरीमध्ये घेवून गेलो व तेथील अधिकाऱ्यांने सांगितले की., सदरची पावती ट्रेझरीची नसुन बनावट आहे. त्यावरुन आमचे लक्षात आले की, श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांनी आमची फसवणुक केलेली आहे. त्यानंतर मी व माझा मित्र हनिफ व शामद यांनी श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांची भेट घेवून त्यांना आम्ही दिलेल्या पैशाची मागणी केली. तेव्हा त्यांनी दिनांक 01/04/2022 रोजी श्री.विजय विठ्ठल होळकर, यांनी दामु भिकन होळकर यांनी आपसात चर्चा करुन नोटरी करुन घेतो व तुम्हाला कोणी किती पैसे द्यायचे असे ठरवुन तुम्हाला तुमचे पैसे देऊन टाकु. आम्हाला आमचे पैसे परत देणार असल्याने मी व श्री. शामद भाई यांनी सदर नोटरीवर सही केलेली आहे. त्यानंतर त्यांनी मला टप्प्या-टप्प्याने एकुण 28,000/- रुपये दिले होते.

त्यानंतर मी पंधरा ते वीस दिवस वाट पाहीली परंतु मला माझी उर्वरित रक्कम मिळाली नाही. म्हणुन मी श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर या दोघांविरुध्द मा. पोलीस अधीक्षक, कार्यालय औरंगाबाद ग्रामीण येथे दिनांक 20/04/2022 रोजी व पोलीस स्टेशन खुलताबाद, औरंगाबाद ग्रामीण येथे दिनांक 26/05/2022 रोजी टपालाद्वारे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवर खुलताबाद पोलीसांनी माझी झालेली



Scanned with OKEN Scanner

फसवणुकी संदर्भात श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांना बोलावुन घेतले. व मला सांगितले की, तुमचा देण्या घेण्याचा व्यवहार असुन तुम्ही वकिला मार्फत त्यांना नोटीस पाठवा माझे 38000/- रुपये दिले नाही म्हणुन मी ॲड. सी.एस. गवई यांचे मार्फत विजय होळकर व दामु होळकर यांना नोटीस दिली होती. त्यानंतर आमच्यात तडजोड होऊन उर्वरित रक्कम व झालेल्या खर्चापोटी श्री. दामु होळकर यांचे खात्यावरील चेकने 50,000/- रुपये मला परत दिले आहे.माझी आता त्यांच्याकडे काही थकबाकी राहीलेली नोही. माझा मित्र हनिफ पठाण यांनी श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांना दिलेले पैसे परत दिले नाही . म्हणुन त्यांनी दिनांक 14/05/2023 रोजी श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर या दोघांविरुध्द पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद शहर येथे तक्रारी अर्ज दिला. अर्जासोबत माझी सही असलेली नोटरी दिलेली आहे.

श्री. हनिफ यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने मला सिडको पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे, यांनी दिनांक 23/05/2023 रोजी सिडको पोलीस स्टेशन येथे हनिफ भाई मार्फत बोलावुन घेतले व मला एकट्यात घेवुन म्हणाले की, तुम्ही श्री.विजय विठ्ठल होळकर, व दामु भिकन होळकर यांचे नोटरीवर तुमची सही असुन यात त्यांचा अर्ज घेऊन तुमच्यावर पण गुन्हा दाखल करु शकतो. तेव्हा तुमच्यावर गुन्हा दाखल करायचा नसेल तसेच गुन्हा दाखल झालेनंतर आरोपी व्हायचे नसेल तर, तुम्ही मला 20,000/- रुपये द्या मी तुमचेवर गुन्हा दाखल करुन आरोपी करणार नाही. तेव्हा श्री. मोरे हे माझेवर गुन्हा दाखल करतील या भितीने मी हो म्हणुन निघुन आलो आहे.

मला पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे, सिडको पोलीस स्टेशन,औरंगाबाद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांच्या विरुध्द तक्रार देण्यासाठी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय औरंगाबाद येथे आले आहे.
माझा व पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे, यांचा कोणताही आर्थिक व्यवहार तसेच उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच त्यांचे सोबत माझे कोणत्याही प्रकारचे भांडण तंटा अगर वैर-दुष्मणी नाही.
 मी दिनांक 24/05/2023 रोजी पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे, यांची भेट घेऊन त्यांना माझेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व आरोपी न करण्यासाठी विनंती करणार आहे. तेव्हा पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे, हे माझ्यावर गुन्हा दाखल न करण्यासाठी व आरोपी न करण्यसाठी 20000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वत: अगर इतरांमार्फत स्वीकारतील. त्यावेळी त्यांना लाचेच्या रकमेसह पकडून त्यांच्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करावी हि विनंती.."अशी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती. सदर तक्रारीवर मी व वारे साहेबांनी तसेच पंचानी सह्या केल्या होत्या.

त्यानंतर सिडको पोलीस स्टेशन, जवळील एका सुरक्षित ठिकाणी पोलीस निरीक्षक, श्री वारे यांनी मला सांगीतले की, आपण तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर कारवाई करु या, त्यानंतर वारे साहेबांनी मला व पंचाना, स्टाफला थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे वारे साहेबांनी दिलेल्या सुचना प्रमाणे सिडको पोलीस स्टेशन, येथे जाऊन पोलीस उप निरीक्षक, श्री. नितीन मोरे यांची भेट घेतली. तेव्हा मोरे साहेबांनी मला तुमच्या विरुध्द अर्ज संबंधाने तुम्हाला काढून टाकु याच्यातुन त्याच्या साठी काहीतरी भरावं लागेल अर्ज काढायला, असे म्हणुन पेपरवर पेनाने 20,000/- असा अंक लिहुन दाखविला. तेव्हा वीस लई होतात. असे म्हणालो तेव्हा श्री. मोरे यांनी तडजोडी अंती 12,000/- रुपये लाचेची मागणी केली. अशा प्रकारे पोलीस उप निरीक्षक, श्री.नितीन मोरे यांनी माझे मित्राने सिडको पोलीस स्टेशनला दिलेल्या दाखल तक्रारी अर्जात मी साक्षीदार असतांना सुध्दा समोरच्यांचा अर्ज घेवुन माझेवर गुन्हा दाखल करतो व त्यात आरोपी करतो असे म्हणुन गुन्हा दाखल न करण्यासाठी व आरोपी न करण्यासाठी माझ्याकडे प्रथम वीस हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 12,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले आहे. परंतु मी गावाकडे गेल्यानंतर माझेकडुन पैशाची व्यवस्था झाली नाही. म्हणुन मी श्री. मोरे साहेबांची भेट घेतली नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 25/05/2023 रोजी श्री.मोरे साहेबांची भेट घेवुन त्यांना लाचेचे 12,000/- रुपये देवुन सापळा कारवाई करण्याचा मी, व वारे साहेब तसेच पंचानी सर्वानुमते निर्णय घेतला.

त्यानंतर दिनांक 25/05/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री.वारे साहेब हे सापळा पथकासह मी माझे मोटार सायकल ने पंच क्र. 1 असे सिडको पोलीस स्टेशन येथील एका सुरक्षित ठिकाणी हजर आलो. तेव्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने त्यांनी थोडक्यात पंचाना, स्टाफला व मला सुचना दिल्या व श्री.नितीन मोरे यांनी लाच स्वीकरल्यानंतरचा पुर्वनियोजीत ईशारा करण्यास सांगीतले. मी श्री. नितीन मोरे यांना लाच म्हणुन देण्यासाठी आणलेले पैसे 12,000/- रुपये ज्यात 500/-रुपये दराच्या 24 भारतीय चलनी नोटांना अँथ्रासीन पावडर लावून लाचेची रक्कम श्री नितीन मोरे, यांना देण्याकरीता माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मला



Scanned with OKEN Scanner

सुचनेप्रमाणे श्री.नितीन मोरे यांना फोन लावल्यानंतर थोड्या वेळाने श्री. नितीन मोरे सिडको पोलीस स्टेशन आले. तेव्हा मी त्यांना माझे मित्राने सिडको पोलीस स्टेशनला दिलेल्या दाखल तक्रारी अर्जात मी साक्षीदार असतांना सुध्दा माझेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व सदर तक्रारी अर्जात गुन्हा दाखल झाल्यावर मला आरोपी न करण्यासाठी श्री.नितीन मोरे यांना विनंती केली. त्यानंतर आम्ही श्री. मोरे साहेबांच्या सांगितल्याप्रमाणे सिडको पोलीस स्टेशनच्या पाठीमागे असलेल्या रसवंती कडे गेलो. तेथे गेल्यावर श्री. नितीन मोरे यांनी मला दिनांक 24/05/2023 रोजी कागदावर लिहुन दिल्याप्रमाणे 12,000/-रुपये ज्यास अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा मी माझे उजवे खिशातुन काढुन पंचासमक्ष श्री.नितीन मोरे यांना दिले .सदर लाचेची रक्कम माझेकडुन श्री. नितीन मोरे यांनी स्वत: स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी 15.55 वाजेच्या सुमारास पुर्वनियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक, पंच क्र. 2 श्री. जारवाल यांचेसह तेथे हजर आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी श्री. नितीन मोरे यांना ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव .नितीन दशरथ मोरे, वय-57 वर्षे व्यवसाय नोकरी पद- पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर रा. घर नं. 42 N-9 R/27 म्हाडा कॉलनी, सिडको औरंगाबाद असे सांगितले. श्री. नितीन मोरे यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशातुन लाचेची रक्कम 12,000/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळुन आले आहे.
अशा प्रकारे दिनांक 24/05/2023 रोजी सिडको पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. नितीन मोरे यांनी माझे मित्राने सिडको पोलीस स्टेशनला दिलेल्या दाखल तक्रारी अर्जात मी साक्षीदार असतांना सुध्दा माझेवर वर समोरच्यांचा अर्ज घेवुन गुन्हा दाखल करुन आरोपी करतो. असे म्हणुन गुन्हा दाखल न करण्यासाठी व गुन्हा दाखल झाल्यास आरोपी न करण्यासाठी माझ्याकडे प्रथम वीस हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 12,000 /- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन लाचेची रक्कम स्वत: दिनांक 25/05/2023 रोजी 15.55 वाजता साई रसवंती, सिडको पोलीस स्टेशनचे पाठीमागे N-7, सिडको औरंगाबाद येथे स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली आहे. ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~ASHOK SHALIKRAM AWCHAR~~ पो.नि. हनुमंत वारे
**Rank** (पद): ~~SI (Sub Inspector)~~ ACB औरंगाबाद **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी ऑफीसर
पो. स्टे. सिडको
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SAMBHAJI BAPURAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362SBPM800



Scanned with OKEN Scanner